# जलसंपदा विभागातील गट-ब (अराजपत्रित) व गट क सरळसेवा भरती सन २०२३
## जाहीर प्रसिध्दीपत्रक

**जा.क्र.दप/पमं/सरळसेवा/समन्वय समिती/मेज-२/ २४९ / सन २०२४** **दि.: ०५.०७.२०२४**

१. जलसंपदा विभागातील गट-ब (अराजपत्रित) व गट क सरळसेवा भरतीसाठी विविध १४ संवर्गांच्या परिक्षा घेणेत आलेल्या आहेत. सदर पदांसाठीची ऑनलाईन परीक्षा दिनांक २७.१२.२०२३, दिनांक २९.१२.२०२३, दिनांक ३१.१२.२०२३, दिनांक ०१.०१.२०२४ व दिनांक ०२.०१.२०२४ रोजी संपन्न झालेली आहे.

२. उमेदवारांची Markwise Merit List शासनाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०३.०३.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

३. सर्व संवर्गांच्या (निम्न श्रेणी लघुलेखक पदाच्या वगळून) नाशिक व ठाणे परिमंडळ कार्यालयातील कागदपत्रे पडताळणी उमेदवारांची (List of Candidates for Document Verification) यादी शासनाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

४. सदर यादीमधील नमूद उमेदवारांना गुणवत्ता व नमूद आरक्षणानुसार प्राथमिक स्तरावर पात्र / अपात्रता अमजावणेसाठी केवळ कागदपत्रे तपासणीसाठी बोलाविण्यात येत आहे. उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी / तपासणी अंती पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणानुसार उपलब्ध पदांनुसार सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रनिम १२२२/ प्र.क्र. ५४/का १३ अ दि. ०४.०५.२०२२ नुसार अंतीम निवडसूची तयार करणेत येईल. कागपदत्र पडताळणी यादीमध्ये उमेदवारांचे नाव समाविष्ठ झाले असले म्हणजे अंतिम निवडसुचीमध्ये / प्रतिक्षायादीमध्ये समाविष्ठ झाला असे नाही, याबाबतची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५. दप्तर कारकुन/ मोजणीदार/ कालवा निरीक्षक यांची कागदपत्र पडताळणी यादी मा. महाराष्ट्र प्राशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद यांच्या याचिका क्र. ४८३/२०२४ तसेच सहाय्यक आरेखक यांची कागदपत्र पडताळणी यादी मा. उच्च न्यायालय, मुंबई रिट पिटीशन (एस. टी) नं. ९८२१/२०२४ यांच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात प्रसिध्द करणेत येत आहेत.

६. उमेदवाराने ज्या परिमंडळासाठी अर्ज केलेला आहे, त्या परिमंडळाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी कागदपत्र पडताळणीसाठी नमुद केलेल्या पत्त्यावर कागदपत्र पडताळणी होणार आहे तरी आपला कागदपत्र पडताळणी अनुक्रमांक (Sr No for DV) व आपणास कागदपत्र पडताळणीसाठीचे ठिकाण पाहून नमूद तारखेस व नमूद ठिकाणी उपस्थित राहण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी.

७. सदर उमेदवारांनी त्यांचे पदानुसार www.wrd.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली तपासणी सूची भरुन त्यांचे संबंधित मूळ कागदपत्रे व मूळ कागदपत्रांच्या साक्षांकित २ प्रतीसह उपस्थित रहावयाचे आहे.

८. सदर पडताळणीस गैरहजर राहिलेल्या अथवा कागदपत्रांची पूर्तता न केलेल्या उमेदवारांस कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी, तसेच भविष्यात याबाबत उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

९. ज्या उमेदवारांने एका संवर्गापेक्षा अधिक संवर्गासाठी वेगवेगळया परिमंडळात अर्ज कलेला आहे व एकापेक्षा अधिक पदांच्या 'कागदपत्र पडताळणी यादी' मध्ये उमेदवाराचा समावेश असेल व कागदपत्र पडताळणीची दिनांक व वेळ एकच असल्यास अशा परिस्थितीत उमेदवाराने संबंधित परिमंडळांना (ठाणे परीमंडळ ई मेल (**wrdrecruitment@gmail.com**) व नाशिक परीमंडळ कार्यालयाचा ई मेल (**2023nashik.zone@gmail.com**) Email व्दारे दि.१०.०७.२०२४ पर्यंत कळवावे, पडताळणीसाठी नवीन दिनांक व वेळ उपलब्ध करून घेण्यात यावा.

१०. अत्यंत अपरिहार्य कारणास्तव एखाद्या उमेदवारास उपस्थित रहाता आले नाही व तसे उमेदवाराने E mail व्दारे दि. १०.०७.२०२४ पर्यंत पूर्वसूचना दिल्यास त्याबाबतची सत्यता समन्वय समिती पडताळून पाहील व त्या उमेदवाराबाबत निर्णय घेण्यात येईल. याबाबतची पुर्वसुचना त्या त्या परिमंडळाच्या नमुद ई-मेलवर पाठविण्यात यावी.

११. जलसंपदा विभागातील गट-ब (अराजपत्रित) व गट क सरळसेवा भरतीबाबत यापुढील इतर आवश्यक सूचना https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वेळोवळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून वरील संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

**स्थळ प्रत मा. अध्यक्ष समन्वय समिती यांचे मान्यतेने**

(सविता चं बोधेकर)
सदस्य सचिव
समन्वय समिती तथा
अधीक्षक अभियंता व परीमंडळीय अधिकारी
दक्षता पथक, मुंबई परीमंडळ, ठाणे

# कागदपत्र तपासणी वेळापत्रक

| अ.क्र | परीमंडळ कार्यालयाचे नाव व संपुर्ण पत्ता | दिनांक | संवर्गाचे नाव | सकाळ सत्र (सकाळी १०:३०) | दुपार सत्र (दुपारी ०२:००) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अधीक्षक अभियंता व परीमंडळीय अधिकारी, दक्षता पथक, मुंबई परीमंडळ, पाटबंधारे विभाग, ठाणे<br>**ई-मेल :- wrdrecruitment@gmail.com**<br>**दुरध्वनी क्र.:- ०२२-२५३२९५६१**<br>**कागदपत्र तपासणीसाठी उमेदवारांनी उपस्थित राहावयाचा पत्ता :-** सिंचन भवन सभागृह, पाचवा मजला कोपरी कॉलनी बारा बंगला रोड, ठाणे (पुर्व) ४००६०३<br>संपर्क अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नाव :- श्री. गणेश पालवे, प्रथम लिपीक मोबाईल नं :- ८२०८७५१२१५<br>श्री. किरण शिंदे, लिपीक टंकलेखक मोबाईल नं. ९९६७९६००५० | दि.१५/०७/२०२४ | सहाय्यक आरेखक | अनु.क्र १ ते २३ | - |
| | | | आरेखक | अनु.क्र १ ते ०६ | - |
| | | | सहाय्यक भांडारपाल | अनु.क्र १ ते ६० | - |
| | | | अनुरेखक | - | अनु.क्र १ ते ८२ |
| | | दि.१६/०७/२०२४ | दप्तर कारकुन / मोजणीदार / कालवा निरीक्षक | अनु.क्र ०१ ते १०० | अनु.क्र १०१ ते २०६ |
| | | दि.१८/०७/२०२४ | दप्तर कारकुन / मोजणीदार / कालवा निरीक्षक | अनु.क्र २०७ ते ३११ | -- |
| | | | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | -- | अनु.क्र ०१ ते ११२ |
| | | दि.१९/०७/२०२४ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | अनु.क्र ११३ ते २२५ | अनु.क्र २२६ ते ३४२ |
| २ | अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व परीमंडळीय अधिकारी, नाशिक परीमंडळ, नाशिक<br>**ई-मेल :- 2023nashik.zone@gmail.com**<br>**दुरध्वनी क्र.:- ०२५३ - २५३४४६६**<br>**कागदपत्र तपासणीसाठी उमेदवारांनी उपस्थित राहावयाचा पत्ता :-** महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, दिंडोरी मार्ग नाशिक ४२२००४<br>संपर्क अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नाव :- श्री. निलेश अहिरे, कार्यकारी अभियंता<br>मोबाईल नं :- ९६२३५२४३२२ | दि.१५/०७/२०२४ | दप्तर कारकुन/ मोजणीदार/ कालवा निरीक्षक | अ.क्र १ ते १५१ | अ.क्र १५२ ते ३०२ |
| | | दि.१६/०७/२०२४ | दप्तर कारकुन/ मोजणीदार/ कालवा निरीक्षक | अ.क्र ३०३ ते ४७७ | अ.क्र ४७८ ते ६५२ |
| | | दि.१८/०७/२०२४ | दप्तर कारकुन/ मोजणीदार/ कालवा निरीक्षक | अ.क्र ६५३ ते ८२१ | -- |
| | | | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | -- | अ.क्र १ ते १८१ |
| | | दि.१९/०७/२०२४ | भु वैज्ञानिक सहाय्यक | अ.क्र १ ते २४ | -- |
| | | | वरीष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | अ.क्र १ ते १० | -- |
| | | | कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | अ.क्र १ ते ०५ | -- |
| | | | प्रयोगशाळा सहाय्यक | अ.क्र १ ते १०४ | -- |
| | | | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | -- | अ.क्र १८२ ते ३३८ |
| | | दि.२०/०७/२०२४ | आरेखक | अ.क्र १ ते ०५ | -- |
| | | | सहाय्यक आरेखक | अ.क्र १ ते ४५ | -- |
| | | | सहाय्यक भांडारपाल | अ.क्र १ ते ४२ | -- |
| | | | अनुरेखक | अ.क्र १ ते ७४ | -- |
| | | | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | -- | अ.क्र ३३९ ते ४७२ |

**स्थळ प्रत मा. अध्यक्ष समन्वय समिती यांचे मान्यतेने**

(सविता चं बोधेकर)
सदस्य सचिव
समन्वय समिती तथा
अधीक्षक अभियंता व परीमंडळीय अधिकारी
दक्षता पथक, मुंबई परीमंडळ, ठाणे